पोलीस अधिक्षक कार्यालय परभणी

## पोलीस शिपाई भरती -२०२२-२३
## पोलीस अधिक्षक कार्यालय,परभणी जिल्हा

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)नियम,२०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि दिनांक २३/०६/२०२२ च्या सेवाप्रवेश नियमात केललेल्या सुधारीत तरतुदी नुसार पोलीस अधिक्षक परभणी यांचे आस्थापणेवरील **पोलीस शिपाई यांची रिक्त असलेली (१११) पदे** भरण्यांसाठी आवेदन पत्र संगणकीय प्रणालीव्दारे **दिनांक ०५/०३/२०२४ ते ३१/०३/२०२४** या कालावधीत स्विकारण्यांत येतील. याबाबतची सविस्तर माहिती policerecruitment2024.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहिती करीता प्रसिध्द करण्यांत आली आहे.

- उमेदवारास पोलीस अधिक्षक परभणी यांच्या आस्थापणेवरील पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्यांची सुविधा policerecruitment2024.mahati.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- **उमेदवार एका पदाकरिता संपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.**
- उमेदवारांनी चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्यावर रद्द होईल.
- पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी परीक्षा घेण्यांत येईल व त्यानंतर होणारी लेखी परिक्षा ही सर्व पोलीस घटकामध्ये लेखी परिक्षा एकाच दिवशी आयोजीत करण्यांत येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेवुनच आवेदन अर्ज भरावा.
- भरती प्रक्रिये मध्ये प्रथम शारीरीक चाचणी घेण्यांत येणार आहे. शारीरीक योग्यता चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणाऱ्या उमेदवारामधुन संबंधीत प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदाच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यांत येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यांत येतील.
- सर्व पोलीस घटकामध्ये लेखी चाचणी एकाच घटकामध्ये लेखी परिक्षा एकाच दिवशी आयोजीत करण्यांत येईल. त्यासाठी अर्जदाराने आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेवुनच आवेदन अर्ज भरावा.
- शारीरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमुद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांमधुन एक गुणवत्ता यादी तयार केली जाईल. तात्पुरत्या निवडसुची मध्ये समावेश झालेल्या उमेदवारांची मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यांत येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवड सुचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसुची तील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. शारीरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रीकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दिनांक १०/१२/२०२० नुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यांत येईल.
- पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणीक अर्हता, शारीरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणा बाबतची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्यांबाबतची माहिती, अर्ज सादर करण्यांचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सुचना policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. सदरहु जाहिरात उमेदवारांनी काळजीपुर्वक वाचुन, समजुन घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथाकरीता उपलब्ध पदांच्या १ % आरक्षित जागा विचारात घेवुन रिक्त पदाबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.
- भरती प्रक्रीयेदरम्यान शारीरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये उमेदवार गैरहजर राहिल्यास त्यास भरती प्रक्रीयेतुन बाद ठरविण्यांत येईल. कार्यालयाने एकदा निश्चीत केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यांत येणार नाही.
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकांत रिक्त असलेली पदे विचारात घेवुनच उमेदवारांने अर्ज सादर करावेत. मागासवर्गिय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतु खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.

CamScanner

, पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक. २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकामध्ये दिनांक २७/०६/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्यांचा अधिकार आहे.

(रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी)
पोलीस अधिक्षक,परभणी.

पोलिस अधिक्षक कार्यालय परभणी

CamScanner

पोलीस अधिक्षक कार्यालय परभणी

## चालक पोलीस शिपाई भरती २०२२-२३
## पोलीस अधिक्षक कार्यालय,परभणी जिल्हा

महाराष्ट्र सहाय्यक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा आणि दिनांक २७.०६.२०२२, दिनांक २३.०९.२०२२ अन्वये सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारीत तरतुदी नुसार पोलीस दलातील पोलीस अधीक्षक, परभणी यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक-३० यांची रिक्त असलेली पदे भरण्याकरीता देखील आवेदन पत्र संगणकीय प्रणालीद्वारे दिनांक ०५.०३.२०२४ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत स्विकारण्यात येतील. हया बाबतची सविस्तर माहिती policerecruitment२०२४.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्तळावर उमेदवाराच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलीस अधीक्षक परभणी यांच्या आस्थापनेवर पोलीस शिपाई चालक या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment२०२४.mahait.org या संकेत स्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरिता संपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.
- पोलीस शिपाई चालक या पदासाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची प्रथम ५० गुणांची शारीरिक चाचणी घेण्यात येईल. सदर शारिरीक चाचणीत किमान ५०% गुण प्राप्त करणारे उमेदवार, संबंधीत प्रवर्गामधील जाहिरातीत नमुद केल्या रिक्त जागांच्या १:१० याप्रमाणात उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र ठरतील.
- लेखी चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना, हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी २५ गुणांची व जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी २५ गुणांची अशी एकुण ५० गुणांची कौशल्य चाचणी द्यावी लागेल. सदर दोन्ही चाचणीमध्ये एकत्रीत किमान ४० टक्के गुण मिळवुन उमेदवारास उत्तीर्ण व्हावे लागेल. कौशल्य चाचणी ही केवळ एक अर्हता चाचणी असुन कौशल्य चाचणीत मिळालेले गुण, गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकुण गुणात समाविष्ट केले जाणार नाहीत. कौशल्य चाचणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.
- सर्व घटकामध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजीत करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेवुनच आवेदन अर्ज भरावा.
- शारिरीक चाचणी व लेखी परीक्षामध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसूची तयार करण्यात येईल तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल, निवडसूचीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल.शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दि.१०.१२.२०२० नुसार अंतिम गुणवत्तायादी तयार करण्यात येईल.
- पोलीस शिपाई चालक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता शारिरीक पात्रता आवश्यक असलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्या बाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सूचना policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. सदरहू जाहिरात उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचून, समजून घ्यावी, तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथांकरीता उपलब्ध पदांच्या १ टक्का आरक्षित जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरय उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.
- भरती प्रक्रियेदरम्यान शारीरिक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास, त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल, कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परीस्थितीत बदल करण्यात येणार नाही.
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतू खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.

CamScanner

- पदोन्नती वरील आरक्षणा संदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहीत याचीका क्रमांक १७५/२०१८ द इतर सलग्न याचीकामध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णया विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचीके बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदाची गनणा केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

(रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी)
पोलीस अधिक्षक,परभणी.